CMYK

बीड । शुक्रवार

१८.०४.२०२५

वर्षे : ५ अंक : १८

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक • www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# एकमेकांविषयी प्रेमाचा पाझर हाच खरा काला: महंत शिवाजी महाराज यांचे प्रतिपादन

## मनोज जरांगे पाटील, आ. धस, डॉ. ज्योतीताई मेटे यांची प्रमुख उपस्थिती





- महंत शिवाजी महाराज यांची सकाळी नऊ वा राक्षसभूवन गावातून मिरवणूक
- मनोज जरांगे पाटील सकाळी दहा वाजता राक्षसभूवन येथे उपस्थित
- महंत शिवाजी महाराज, आ. सुरेश धस, धनंजय देशमुख, राजेंद्र मस्के, मेहबूब शेख, सौरभ बजरंग सोनवणे एका मंचावर
- उमापूर ग्रामस्थांनी सवाद्य मिरवणूक काढून घेतले नारळ
- तीन वाजता लाखो भाविकांना काला महाप्रसाद वाटप
- सप्ताहात संत-महंतांची उपस्थिती
- मनोज जरांगे पाटील, आ. सुरेश धस यांनी ऐकले पूर्ण कीर्तन
- आ. सुरेश धस यांनी आष्टी येथे २०३६ मधील तर आर्वी ग्राम स्थांनी २०३७ मधील घेतले नारळ

**बीड । प्रतिनिधी**

एकमेकांविषयी एकमेकांच्या हृदयात प्रेमाचा पाझर फुटावा हाच खरा काला असल्याचे प्रतिपादन महंत प्रेममूर्ती शिवाजी महाराज यांनी केले. श्री क्षेत्र नारायण गडच्या ७३ व्या नारळी सप्ताहाची सांगता शिरूर तालुक्यातील राक्षसभूवन येथे गुरुवारी काल्याच्या कीर्तनाने झाली, यावेळी ते बोलत होते. यावेळी मनोज जरांगे पाटील, मठाधिपती संभाजी महाराज, आ. सुरेश धस, धनंजय देशमुख, डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे, मेहबूब शेख, माजी आमदार बाळासाहेब आजबे, दिलीपराव गोरे, गणेशराव नलावडे, बळीराम गवते, बी. बी. जाधव, महादेव तुपे यांची प्रमुख उपस्थिती होती.

राक्षसभूवन येथे सकाळी नऊ वा. महंत शिवाजी महाराज यांची गावांमधून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी पाथर्डी येथील संगित गायन पथकामधील कलाकारांनी भजन व भक्तीगीत गावून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी ग्रंथपूजन करण्यात आले. दुपारी साडेबारा वा. महंत शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनास सुरुवात झाली. यावेळी महंत शिवाजी महाराज म्हणाले, की जीवनामध्ये अध्यात्म हाच खरा आनंद आहे आणि हा आनंद सप्ताहमधून मिळतो. समाजात व्यसनाधिनता, क्रोध वाढला आहे, समाजाला चांगल्या मार्गाला लावण्याचे काम साधू करतात, त्यामुळे साधुच्या आशीर्वादाची प्रत्येकाला गरज आहे. माणसाला माणूस साधू बनवतात, म णसातील दोष साधू दूर करतात असेही महंत शिवाजी महाराज म्हणाले. एकमेकांविषयी एकमेकांच्या हृदयात प्रेमाचा पाझर फुटावा हाच खरा काला असल्याचे प्रतिपादन महंत प्रेममूर्ती शिवाजी यांनी करून मुलांसाठी संपती ▶▶ उर्वरित पान २ वर

### • पुढील सप्ताह उमापूर येथे

नारायणगडचा पुढील ७४ वा नारळी सप्ताह गेवराई तालुक्यातील उमापूर येथे होणार आहे. उमापूर येथील महिला पुरूषांनी सुंदर मिरवणूक काढून उपस्थितांची मने जिंकली.

### • बाबांचा शब्द पाळणार–आ. धस

श्री क्षेत्र नारायण गड व महंत शिवाजी महाराज हे आपल्याला जो शब्द देतील तो शब्द आपण शतशः पाळणार असल्याचे प्रतिपादन आ. सुरेश धस यांनी केले. नारायणगडचा २०३६ चा नारळी सप्ताह आष्टी येथे होणार असून याचे नारळ आज आ. सुरेश धस यांना महंत शिवाजी महाराज यांच्या हस्ते देण्यात आले.

# गालावरुन वारं गेलं; वाणी बंद, धनंजय मुंडेंसाठी प्रार्थना करा, नामदेव शास्त्री यांचं आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

भगवान गडाचे महंत नावदेवशास्त्री यांनी पुन्हा एकदा माजी मंत्री धनंजय मुंडेंची पाठराखण केली आहे. धनंजय मुंडे यांच्यासाठी सर्वांनी मिळून प्रार्थना करा, असं महंत नामदेव शास्त्री यांनी म्हटलं आहे. धनंजय मुंडेंच्या गालावरून वारं गेलं आहे. चांगली वाणी बंद पडली आहे. पहिल्या



पदावर येऊन धनंजय मुंडे यांच्या हातून समाजाची सेवा घडावी असं नामदेव शास्त्री यांनी म्हटलं आहे. तसेच भगवान गडासोबत छेडछाड करू नका असंही ते यावेळी म्हणाले आहेत. त्यामुळे आता नामदेव शास्त्री यांचा रोख नेमका कोणाकडे आहे? अशी चर्चा आता सुरू झाली आहे. भगवान बाबा ▶▶ उर्वरित पान २ वर

# 'बाबासाहेब आगेंच्या हत्येनं मन सुन्न झालं', पंकजा मुंडेंनी स्वीकारली कुटुंबीयांची जबाबदारी



**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या माजलगाव शहरात भाजप नेते बाबासाहेब आगे यांची दिवसाढवळ्या कोयत्याने सपासप वार करून हत्या करण्यात आली होती. बाबासाहेब आगे यांच्या हत्येनंतर त्यांच्या कुटुंबीयांना मोठा धक्का बसला.

आज भाजपच्या नेत्या आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी बाळासाहेब आगे कुटुंबीयांची जबाबदारी स्वीकारली असल्याचे सांगितले. 'बाळासाहेब आगे यांच्या हत्येने मन सुन्न झालं. एक धडाडीचा कार्यकर्ता गमावल्याचे दुःख झाले.' असे म्हणत मंत्री पंकजा मुंडे यांनी खंत व्यक्त केली. भाजपचे लोकसभा विस्तारक बाबासाहेब आगे यांच्या निर्घृण हत्येनंतर त्यांच्या कुटुंबाची जबाबदारी राज्याच्या पर्यावरण आणि वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी स्विकारली आहे. 'बाबासाहेब आगे यांच्या हत्येने मन सुन्न झालं. एक धडाडीचा कार्यकर्ता गमावला.', अशा शब्दांत त्यांनी आपल्या शोक भावना व्यक्त केल्या. आगे यांच्या हत्येप्रकरणी ▶▶ उर्वरित पान २ वर



# केजमध्ये चिकन विक्रीचा वाद, अल्पवयीन मुलाला उचलून आदळलं, जागेवरच मृत्यू!

**केज । प्रतिनिधी**

गेल्या काही महिन्यांपासून गुन्हेगारीच्या अनेक घटनांनी बीड महाराष्ट्राच्या केंद्रस्थानी आले आहे. दिवसाढवळ्या होणाऱ्या हत्या, बंदुकीचा धाक, धाकदपट, किरकोळ कारणातून मारहाण अशा घटनांनी गुन्हेगारीच्या टोकावर जाऊन थांबलेल्या बीड जिल्ह्यात चिकन विक्रीच्या वादातून अल्पवयीन मुलाला उचलून सिमेंटच्या नाल्यावर आदळल्याने त्याचा जागेवरच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. केज शहरातील या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. चिकन विक्रीच्या किरकोळ वादातून घडलेल्या या घटनेतील आरोपीही ▶▶ उर्वरित पान २ वर




# वक्फ विधेयकाविरोधात बीडमध्ये 'मानवी साखळी'



**बीड । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने वक्फ कायदा आणला असून हा कायदा भारतीय संविधानात दिलेल्या अधिकाराचे उल्लंघन करणारा आहे. या कायद्याच्या विरोधात भारतातील मुस्लिम समाजात विविध स्वरूपाचे आंदोलन करण्यात येत आहे. हा कायदा रद्द करण्याची मागणी केली जावू लागली, काल बीड येथे छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण या ठिकाणी ऑल इंडिया मुस्लिम ▶▶ उर्वरित पान २ वर

**• वक्फ बोर्डाच्या विलाविरोधात बीडमध्ये मुस्लिम समाजाचे आंदोलन;**

**• वक्फकायद्यातील दुरूस्त्या भेदभावपूर्ण; मुलभूत अधिकाराचे उल्लंघन**

CMYK

# उष्मघातापासून बचाव, लक्षणे आणि उपाययोजना

**येणाऱ्या काही दिवसामध्ये आपल्या भागात उष्णतेची लाट जाणवू शकते, उष्मघात होऊ नये यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांवर भर द्यावा उष्माघाताची लक्षणे आढळून इाल्यास तातडीने रुग्णाच्या शरीराचे तापमान खाली आणण्यासाठी जवळच्या रुग्णालयात उपचार करुन घ्यावा. या उष्णतेच्या काळात उष्माघात होऊ नये. यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांवर भर देणे गरजेचे आहे.उष्मघात उपचारासाठी शासकीय रुग्णालयांत सज्जता ठेवण्यात यावी अशा सूचना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिल्या आहेत.**

## उष्मघात होण्याची कारणे साधारणत: पुढील आहेत.

यात उन्हामध्ये शारिरीक श्रमाचे, मजूरीचे कामे फार वेळ करणे, कारखान्याचे बॉयलर रुममध्ये काम करणे, काच कारखान्यातील काम करणे, जास्त तापमानाच्या खोलीत काम करणे, घट्ट कपड्यांचा वापर करणे, उष्णतेशी अथवा तापमानातील वाढत्या परिस्थितीशी सतत संबध येणे. उष्मघाताची लक्षणे जाणवू लागल्यास तातडीने रुग्णाच्या शरीराचे तापमान खाली आणण्यासाठी जवळच्या रुग्णालयात उपचार करुन घ्यावेत. यासाठी उष्माघात उपचारांसाठी शासकीय रुग्णालयात सज्जता ठेवण्यात यावी.

## उष्मघाताची लक्षणे

शरीरास घाम सुटणे, तहान लागणे, शरीर शुष्क होणे,ताप येणे (१०२) पेक्षा जास्त, त्वचा कोरडी पडणे, भुक न लागणे, चक्कर येणे, निरुत्साही होणे, डोके दुखणे, रक्तदाब वाढणे, मानसिक बेचैन, अस्वस्थ, बेशुध्द अवस्था उलटी इत्यादी होणे.

## जोखमीचे गट

वय ५ वर्षापेक्षा कमी व ६५ वर्षापेक्षा जास्त, कष्टाची सवय नसणारे लोक, धुम्रपान, मद्यपान करणारे आणि कॉफी पिणारे व्यक्ती, मुत्रपिंड,- हदयरोग,यकृत, त्वचा विकार लठ्ठपणा, मधूमेह, उच्च रक्तदाब इत्यादी रुग्ण. Diuretice anti allergie trangilzers stimulants ete या औषधाचे सेवन सुरु असलेले रुग्ण, जास्त् तापमान, अति आद्रता, वातानुकुलनाचा अभाव, तंग कपडे, शेत काम, कारखान्यातील काम ऊन आणि उष्णतेशी संबधीत व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती.

## प्रतिबंधात्मक उपाय

वाढत्या तापमानाच्या वेळेत कष्टाची कामे टाळणे, कष्टाची कामे सकाळी लवकर अथवा संध्याकाळी कमी तापमान असताना करावी, उष्णता शोषुन घेणारे कपडे उदा. काळया किंवा भडक रंगाचे कपडे वापरु नयेत. सैल व उष्णता परावर्तित करणारे पांढ-या रंगाचे कपडे वापरावेत. जल संजीवनीचा वापर करावा, पाणी भरपूर प्यावे. सरबत प्यावे, उन्हाम ध्ये काम टाळावे व सावलीत विश्रांती घ्यावी. शक्यतो उन्हात फिरण्याचे टाळावे. आवश्यकता असल्यास उन्हात जाण्यापूर्वी भरपूर पाणी प्यावे. किंवा लिंबू शरबत प्यावे. उन्हात जाण्या आगोदर जेवन करावे, रिकाम्या पोटी उन्हात जाऊ नये. कान व डोक्याचा उन्हापासून बचाव करणे आवश्यक आहे. डोक्याभोवती पांढरा रुमाल गुंडाळावा. गॉगल्स व हेलमेट वापरावी. वृध्दांना व बालकांना उन्हात फिरु देऊ नये.



## उपचार

रुग्णास हवेशीर खोलीत ठेवावे, खोलीत पंखे, कुलर ठेवावीत शक्यतो वातानकुलीत खोलीत ठेवावेत. रुग्णाच्या शरिराचे तापमान खाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. रुग्णाला बर्फाच्या पाण्याने अंघोळ घालावी. रुग्णाच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्टया ठेवाव्या. आईसपॅक लावावेत, ओआरएस सोल्युशन द्यावे. उन्हाळ्यामुळे उष्माघाताचे रुग्णावर उपाययोजना करण्यासाठी व मृत्यू टाळण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांनी, कुटीर रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयांनी आवश्यक ती सर्व तयारी ठेवण्याबाबत कळविण्यात आले आहे. उदा. हवेशीर खोली, पुरेशी औषधी, सलाईनचा साठा, खोलीत पंखे, कुलर इत्यादी सुस्थितीत ठेवावी. बर्फाच्या उपलब्धतेसाठी फ्रिज सुस्थितीत असणे आवश्यक आहे. उष्मघाताची कारणे लक्षणे प्राथमिक उपचार त्याचप्रमाणे उष्मघात होऊ नये म्हणून घ्यवयाची काळजी याची माहिती आरोग्य शिक्षणाव्दारे प्रचार माध्यमातुन द्यावी.

## काय करावे

तहान नसली तरी भरपूर पाणी सरबत प्यावे हवा खेळती राहध्यासाठी पख्यांचा वापर करावा. सैल व सौम्य रंगाचे सुती कपडे वापरावेत. सावलीत थांबणे, हळुवार चालावे, टोपी,फेटा, चष्मा वापरणे, मजूर वर्गास वारंवार विश्रांती घेऊ द्यावी. उन्हातुन आल्यानंतर चेह-यावर ओला कपडा ठेवावा.

## काय टाळावे

मद्य, सोडा, कॉफी, अती गार पाणी आदी पिणे टाळावे, गरज नसतांना उन्हात फिरणे, तंग व गडद कपडे वापरणे, सवय आहे. म्हणून उन्हात निघणे, अति व्यायाम करणे, बंद कारमध्ये राहणे, अति शारिरीक कष्टाचे कामे करणे. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नये. दुपारी १२. ०० ते ३.३० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळावे. तसेच मोकळया हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावी. अगदी साध्या व सोप्या उपाययोजनांव्दारे आपण उष्माघातापासून आपले संरक्षण करु शकतो असे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी यांनी केले आहे. अगदी साध्या आणि सोप्या उपाययोजनाव्दारे आपण उष्मघातापासून आपले संरक्षण करु शकतो.चला तर मग प्रशासनाच्या या आवाहनानुसार काळजी घेऊया. उष्मघातापासून आपले आपण संरक्षण करुया.

# आयपीएलचा फिव्हर सोशल मीडियावरही!

आयपीएल अर्थात इंडियन प्रीमियर लीगचे हे अठरावं वर्ष आहे. सलग अठरा वर्ष आपली लोकप्रियता टिकवून ठेवणारी आयपीएल ही जगातील एकमेव क्रिकेट लीग आहे. गेली अठरा वर्ष केवळ भारतातीलच नाही तर जगातील सर्वाधिक लोकप्रिय क्रिकेट लीग म्हणून आयपीएलकडे पाहिले जाते. जगभरातील अनेक दिग्गज खेळाडू या लीगमध्ये सहभागी होतात. मुळातच क्रिकेटला एका धर्माप्रमाणे स्थान असलेल्या भारतामध्ये आयपीएल सुरू असल्याने सहभागी संघाचे फॅन फॉलोअर्सची संख्या देखील खूप मोठी आहे. आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करण्यासाठी फॅन मैदानावर गर्दी करताना दिसतात. आयपीएलचा सामना कोणत्याही मैदानावर, कोणत्याही शहरांमध्ये असो क्रिकेट रसिकांच्या उदंड प्रतिसादामुळे मैदाने तुडुंब भरली असल्याचे चित्र आपण दरवर्षीच पाहतो मात्र यावर्षी मैदानासोबतच मैदानाबाहेरही आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करण्यासाठी चाहत्यांमध्ये स्पर्धा लागली आहे. आजचे युग सोशल मीडियाचे युग आहे. सोशल मीडियाचा वापर न करणारा क्रिकेट चाहता शोधूनही सापडणार नाही. आयपीएलमध्ये सहभागी असणाऱ्या सर्वच्या सर्व म्हणजे दहाच्या दहा संघाचे स्वतंत्र ट्विटर ( एक्स ) अकाउंटस आहेत. प्रत्येक संघाला ट्विटरवर ( एक्स ) फॉलो करणारे लाखो फॉलोअर्स आहेत. हे फॉलोअर्स ट्विटर वरून आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करत असतात. आयपीएलची मॅच चालू असताना ट्विट्स चा अक्षरशः पाऊस पडतो. सेकंदाला हजारो ट्विट्स येत असतात. जो तो आपल्या संघाला सपोर्ट करण्यासाठी ट्विट करत असतात. या सर्वांमध्ये मुंबई इंडियन्स आणि रॉयल बंगळुरू चॅलेंज या संघांचे फॅन फॉलोअर्स सर्वात जास्त आहेत. ट्विटर प्रमाणेच व्हाट्सएप, फेसबुक, इन्स्टाग्रामवर देखील चाहते आपल्या संघाला सपोर्ट करीत असतात. आपल्या आवडत्या संघाची मॅच असेल तर चाहते आपल्या संघाला सपोर्ट करण्यासाठी व्हाट्सएपवर स्टेटस ठेवतात. सध्या सोशल मीडियाचं चित्र पाहिलं तर मुंबई इंडियन्स, चेन्नई सुपर किंग व रॉयल चेलेंजर्स बंगळुरू या तीन संघांना सोशल मीडियावर चाहत्यांचा सर्वात जास्त सपोर्ट मिळताना दिसत आहे. खेळाडूंमध्ये सर्वात जास्त सपोर्ट रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाच्या विराट कोहली याला मिळत आहे. टी २० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला तरी विराट कोहलीची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे हे सोशल मीडियावरुन लक्षात येते. दूरचित्रवाणीवर तर प्रेक्षक सामने पाहतच असतात पण ज्यांना दूरचित्रवाणीवर सामना पाहणे शक्य होत नाही ते मोबाईलवर सामना पाहतात. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा सामना कोणत्याही संघासोबत असला तरी प्रेक्षक त्यांचा सामना आवर्जून पाहतात. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सामना जिओ टीव्ही वर सर्वात जास्त पाहिला जातो. करोडो प्रेक्षक जिओ टीव्हीवर सामने पाहतात. प्रत्येक सामन्याला करोडो प्रेक्षक मिळतात हा एक विश्वविक्रमच आहे.




फेसबुक, व्हाट्सएपवर मॅच कोण जिंकणार याबद्दल चाहत्यांमध्ये पैजा लागत आहे. मॅच संपल्यानंतर मॅचवर आधारित तसेच प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या खिल्ली उडवणाऱ्या मजेशीर मिम्स बनवून व्हायरल केल्या जात आहे. हे मिम्स बोलके असतात. यातून करमणूक तर होतेच पण संघाची सद्यस्थिती काय आहे हे देखील समजते. गुजरात टायटन संघाचा मुख्य प्रशिक्षक आशिष नेहरा खेळाडूंना सतत काही ना काही सल्ले देत असतो. ड्रिंक्स ब्रेक मध्ये तर तो कर्णधार आणि खेळाडूंना सल्ला देत असतोच पण सामना चालू असतानाही तो खेळाडूंचे डोके खात असतो. वेडावाकडा चेहरा करून हातवारे करत तो खेळाडूंचे डोके खात असतो त्यामुळे त्याची खिल्ली उडवणारे अनेक मिम्स सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहेत. चेन्नई आणि मुंबई संघ सध्या पराभवाच्या गर्तेत सापडले आहेत. सलग पाच सामन्यात पराभव झाल्याने चेन्नई संघ नेटिझन्सच्या निशाण्यावर आला असून या संघाची सोशल मीडियावर चांगलीच खेचली जात आहे. तीच गत मुंबईची आहे. मुंबईचाही सलग चार सामन्यात पराभव झाला आहे. त्यामुळे या दोन्ही संघांना सोशल मीडियावर टार्गेट केले जात आहे. या दोन्ही संघाचे आधारस्तंभ असलेले धोनी आणि रोहित शर्मा हे देखील आपल्या लौकिकाला साजेशी कामगिरी करत नसल्याने त्यांची देखील सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात खिल्ली उडवली जात आहे. प्रतिस्पर्धी संघाची आणि संघातील खेळाडूंची मजेशीर मिम्स आणि बनवून आणि मेसेज करून खिल्ली उडवतानाच नेटकरी आपल्या आवडत्या संघाला मात्र भरघोस पाठिंबा देत आहेत. आपल्या आवडत्या संघाला भरघोस पाठिंबा देतानाच प्रतिस्पर्धी संघाची खिल्ली उडवून फॅन आयपीएलचा फिव्हर आणखी वाढवत आहे. एकूणच केवळ मैदानावरच नव्हे सोशल मीडियावर देखील आयपीएलचा फिव्हर वाढल्याचे दिसून येत आहे.

पान १ वरून पुढे...

## एकमेकांविषयी प्रेमाचा...

करण्यापेक्षा मुलांना संस्कारीत करा, शेती विका पण मुलांना शिकवा, काहीही अडचणी आल्या तरी आत्महत्या करू नका असे आवाहनही महंत शिवाजी महाराज यांनी केले. आपण सर्व एकाच भगवंताचे स्वरुप आहोत, वारकरी संप्रदाय जातीभेद मानत नाही व आपश्री क्षेत्र नारायण गड सर्व जाती-धर्माला सोबत घेऊन चालणारा असल्याचेही महंत शिवाजी महाराज म्हणाले. काल्याच्या कीर्तनानंतर उपस्थित लाखो भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आला.

## गालावरुन वारं गेलं;....

जेव्हा मारतात. तेव्हा त्या काठीचा आवाज येत नाही, असंही नामदेव शास्त्री यांनी यावेळी म्हटलं आहे.

मी जेव्हा फेटा बांधण्यासाठी गेलो तेव्हा मला फोन आला होता. आपल्या बीड जिल्ह्याचे भूमिपूत्र धनंजय मुंडे या कार्यक्रमाला येणार होते. ते दोन तास हेलीकॉप्टरच्या शेजारी बसले मात्र त्यांना क्लेअरन्स मिळाला नाही. त्यामुळे त्यांना येता आलं नाही. त्यांचा दौरा रद्द झाला. मला तर असं वाटतं की जे त्यांच्या गालावरून वारं गेलं आहे, सगळ्यांनी मिळून भगवान बाबांना प्रार्थना करा, एवढी चांगली वाणी जी बंद पडली आहे, ती सुरू व्हावी आणि पुन्हा पहिल्या पदावर येऊन समाजकल्याण त्यांच्या हातानं घडावं, एवढंच त्यांच्याविषयी आपण बोलू या, असं नावदेव शास्त्री यांनी म्हटलं आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, गडावर सर्वजण एकोप्याने राहतात, आमच्यात खडे टाकू नका, ज्यांचं कल्याण करायचं आहे, त्यांनी या. हा वारकरी संप्रदाय आहे. जातीपातीच्या पलिकडचा संप्रदाय आहे. पण दुसरा शब्द सांगताना सांगून जातो. गडासोबत छेडखानी करू नका, भगवान बाबा जेव्हा पाहातातना तेव्हा आईच्या डोळ्यातून आलेलं प्रेम असं पाझरतं. पण जेव्हा ते मारताना तेव्हा त्या काठीचा आवाज येत नाही पण जीवन उद्ध्वस्त होतं. हजारो लोकांनी हे पाहिलेलं आहे, असंही यावेळी नामदेवशास्त्री यांनी म्हटलं आहे.

## 'बाबासाहेब आगेंच्या...

पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करत त्याला अटक केली. अनैतिक संबंधातून बाळासाहेब आगे यांची हत्या करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

पंकजा मुंडे यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की,

पान १ वरून पुढे...

'बाबासाहेब आगे यांची निर्घृण हत्या झाल्याची बातमी जेव्हा कानावर आली, ते ऐकून मन सुन्न झाले. काहीच सुचत नव्हते.' बाबासाहेब आगेच्या हत्या प्रकरणाच्या एका दिवसानंतर पंकजा मुंडे यांनी या घटनेवर आपल्या शोक भावना व्यक्त केल्या.

'आगे हे भाजपचे धडाडीचे कार्यकर्ते होते, संघाचे संस्कार त्यांच्यावर असल्याने प्रत्येकाच्या मदतीला धावून जाण्याचा त्यांचा स्वभाव होता. माझ्या लोकसभा निवडणुकीत बुथ विस्तारक म्हणून अतिशय महत्वाची जबाबदारी त्यांनी खूप मेहनतीने पार पाडली. अशा मनमिळावू कार्यकर्त्यांची अशा प्रकारे निर्घृण हत्या झाली हे ऐकून मनाला खूप वेदना झाल्या. ' ूलशी ऊीळाश : शेअर्समध्ये अधिकचा नफ्याचे आमिष पडले महागात: ७७ लाख रुपयांची फसवणूक

तसंच, 'बाळासाहेब आगे यांच्या हत्येच्या घटनेचा मी तीव्र निषेध करते. जिल्हयात आल्यानंतर पहिल्यांदा त्यांच्या पत्नी आणि कुटुंबाची मी भेट घेणार आहे. त्यांच्यावर कोसळलेल्या दुःखात माझा परिवार सहभागी आहे. आगे यांच्या कुटुंबाची जबाबदारी मी घेणार असून त्यांना सर्वतोपरी मदत करेल.' असे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

## केजमध्ये चिकन....

अल्पवयीन आहे. रेहान कुरेशी असे मृत्यू झालेल्या मुलाचे नाव असून या प्रकरणी केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अल्पवयीन आरोपीचा शोध घेतला जात आहे.

नक्की झाले काय ?

चिकन विक्रीच्या वादातून एका अल्पवयीन मुलाला त्याच्याच शेजारी चिकन विक्रीचे दुकान असलेल्या मुलाने उचलून सिमेंटच्या नाल्यावर आदळल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. घटना केज मध्ये घडली असून रेहान कुरेशी असे मृत्यू झालेल्या मुलाचे नाव आहे. या प्रकरणात केज पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी अल्पवयीन आहे.तर याचा पोलिस अधिक तपास करत आहेत.चिकन विक्रीच्या किरकोळ वादातून हा प्रकार घडल्याने केज तालुक्यात खळबळ उडाली आहे.दरम्यान अल्पवयीन आरोपीचा शोध केज पोलिस घेत आहेत. केज शहरात चिकन विक्रीच्या किरकोळ वादातून एक धक्कादायक घटना घडली आहे. रेहान कुरेशी नावाच्या अल्पवयीन मुलाचं दुसऱ्या एका अल्पवयीन मुलाशी वाद झाला. हा वाद वाढत गेला आणि आरोपीने रागाच्या भरात रेहानला उचलून थेट सिमेंटच्या नाल्यावर आपटलं. डोक्याला गंभीर मार लागल्याने रेहानचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोपी अल्पवयीन असल्याने त्याचा शोध घेतला जात आहे.

पान १ वरून पुढे...

## वक्फ विधेयकाविरोधात...

पर्सनल लॉ बोर्डच्या वतीने मानवी साखळी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामध्ये शहरातील हजारो मुस्लिम बांधवांचा सहभाग होता. हातात फलक घेवून मुस्लिम बांधव या आंदोलनात सहभागी झाले होते. काही राजकीय पक्षाचे नेते व कार्यकर्ते आंदोलनामध्ये सहभागी झालेले होते.

गेल्या काही दिवसांपूर्वी केंद्र सरकारने वक्फ संदर्भात कायदा केला आहे. हा कायदा अन्यायकारक आहे. कायद्याचा सर्वस्तरातून विरोध होवू लागला. कायदा रद्द करण्याची मागणी केली जावू लागली. देशातल्या विविध भागात कायद्याच्या विरोधात मुस्लिम समाजाकडून आंदोलन देखील केले जात आहे. बीड येथे काल छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण या ठिकाणी मानवी साखळी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात शहरातील हजारो मुस्लिमांचा सहभाग होता. हातात फलक घेवून मुस्लिम बांधव आंदोलनामध्ये सहभागी झाले होते. वक्फ कायद्यातील दुरूस्त्या भेदभावपूर्ण असून भारतीय संविधानात दिलेल्या मुलभूत अधिकाराचे उल्लंघन करणाऱ्या आणि मुस्लिम वक्फ मालमत्तावर कब्जा करण्याचा कट करत आहे. सत्ताधारी पक्षाने आपले संख्याबळ वापरून हा कायदा आणलेला आहे. देशातील कोट्यावधी मुस्लिम अल्पसंख्याक व न्यायप्रिय नागरीकांच्या इच्छेविरूद्ध वक्फ कायद्यात मनमानी व भेदभावपूर्ण दुरूस्त्या केल्या आहेत. कायदा रद्द करण्याच्या मागणीसाठी काल मुस्लिम समाज एकत्रित आला होता. यावेळी काही धर्मगुरूंनी आंदोलनकर्त्यांना मार्गदर्शन केले. दरम्यान जोपर्यंत हा कायदा रद्द केला जात नाही तो पर्यंत वेगवेगळ्या पद्धतीनुसार आंदोलन करण्याचा निर्णय मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डने घेतला आहे.

यांची होती उपस्थिती- कालचे आंदोलन वक्फ बचाव मोहिम, मजलीस उलेमा बीड पर्सनल लॉ बोर्ड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले. या आंदोलनामध्ये मुफ्ती आरिफ साहब, मौलाना हाफीज जाकेर सिद्धीकी, मौलाना शकील कासमी, मौलाना अखील कासमी, ख्रिश्चन धर्मगुरू, मौलाना अब्दुल रहिम, मौलाना मुफ्ती मोहियोद्दीन, शफीक हाश्मी, मुफ्ती मोहम्मद अन्वर नोमानी, आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम, फारुक पटेल, मोईन मास्टर, शेख शफीक, सीए जाधव, गणेश वरेकर, अशोक हिंगे, विष्णू वाघमारे, मौलाना साबेर, रविंद्र दळवी, अब्दुल बाकी, नितीन जायभाय यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

पान ४ वरून पुढे...

## पत्रकार महेश सदरे...

त्यांच्या निधनाने सदरे कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. श्रीमती निलावती सदरे यांच्या पार्थिवावर बुधवार रोजी दुपारी ३ वाजता वडवणी येथील वैकुंठधाम स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. सदरे कुटुंबियांच्या दुःखात दैनिक मराठवाडा पत्र परिवार सहभागी आहे.

## आनंदऋषिजी हॉस्पिटल...

आणि वचनबद्धता सामावून घेण्यासाठी लवचिक वेळापत्रक पर्याय ऑफर करतो. आम्ही रुग्णांना किडनी आरोग्य आणि डायलिसीस बद्दल ज्ञान देऊन सक्षम करतो, त्यांना त्यांच्या काळजीबद्दल माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत करतो. चॅरिटेबल हेल्थ केअर इन्स्टिट्यूट असल्याने आम्ही अतिशय वाजवी शुल्कासह डायलिसिस सेवा देतो. बहुतेक रुग्णांना सवलत किंवा मोफत डायलिसिस उपचाराची सुविधा देखील दिली जाते. हे देखील आढळून आले की ४०-६० मूत्रपिंड निकामी रुग्ण एचआयव्ही आणि हिपॅटायटीसने ग्रस्त आहेत, ज्यासाठी इतर मूत्रपिंड-निकामी रुग्णांना संसर्ग होऊ नये म्हणून आमच्याकडे स्वतंत्र / स्वतंत्र डायलिसिस मशीन आहे. संत आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने गेल्या २० वर्षापासून हॉस्पिटल कार्यरत आहे. तरी बीड शहरातील व पंचक्रोषीतील डायलेसिस रुग्णांना बीडचे विश्वस्त व समस्त जैन समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

## विमा योजनेचा...

मॅनेजर राज ईबिंजर व विभागीय व्यवस्थापक अमित धुळे, शाखा व्यवस्थापक अंकुश जाधव यांच्या हस्ते हा धनादेश त्यांना सुपूर्द करण्यात आला. यावेळी बोलताना विभागीय व्यवस्थापक अमित धुळे यांनी सांगितले की शासनाच्या माध्यमातून ज्या विमा योजना ग्राहकांसाठी तयार करण्यात आलेले आहेत त्या अत्यंत लाभदायक आहेत. अत्यंत कमी पैसे भरून कुटुंबासाठी विमा कवच निर्माण होऊ शकते. त्यामुळे या योजनाचा जास्तीत जास्त ग्राहकांनी लाभ घेतला पाहिजे. बँक ग्राहकांच्या सेवेत नेहमी तत्पर असते त्यामुळे योजनेचा फायदा घेण्यासाठी जास्तीत जास्त ग्राहकांनी बँकेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा असे बँकेचे चीफ मॅनेजर राज ईबिंजर यांनी यावेळी सांगितले तर बँकेचे शाखा व्यवस्थापक अंकुश जाधव यांनी सांगितले की वडवणी शाखेच्या माध्यमातून सर्व ग्राहकांसाठी आम्ही ही योजना घेण्यासाठी आग्रह करणार आहोत अत्यंत कमी पैशांमध्ये या योजनेचा फायदा मिळू शकतो त्यामुळे आम्ही सर्व ग्राहकांना जनजागृती करून त्याचा फायदा मिळवून देणार आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते जलव्यवस्थापन कृती पंधरवडाचे उद्घाटन संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

जलसंपदा विभाग जिल्हा बीड मार्फत जल व्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ कार्यक्रमाचे दिनांक १५ एप्रिल २०२५ रोजी नियोजन समिती सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे सकाळी ११:३० वाजता जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ छत्रपती संभाजी नगर यांच्या पुढाकाराने जल व्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी श्रीमती कविता जाधव, जिल्हा कृषी अधिकारी सुभाष साळवे, तहसीलदार चंद्रकांत शेळके, कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा मुकुंद आंधळे, अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या पल्लवी जगताप,यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलन व जलपूजन तसेच जल प्रतिज्ञा घेऊन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यकारी अभियंता नखाते यांनी केले. पाणी व्यवस्थापनाबाबत लेखाजोखा मांडला.

शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना जल व्यवस्थापनाबाबत विशेष मार्गदर्शनाचा उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. नंदकिशोर खामकर यांनी उपस्थितांना जल प्रतिज्ञा दिली. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी मनोगत व्यक्त करताना जलसंपदा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या जल व्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ च्या सर्व कार्यक्रमात जिल्हाधिकारी कार्यालय हे जल संपदा विभागासोबत राहिल अशी ग्वाही दिली. तसेच पाणी बचतीचे मोलाचे मार्गदर्शन केले. मुकुंद आंधळे, सुभाष साळवे, चंद्रकांत शेळके, सुभाष जाधव, पंजाब काकडे यांनी पाणी वापराबाबत आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती पल्लवी जगताप यांनी व्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ मध्ये विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्याच्या सूचना जलसंपदा विभाग बीड अंतर्गत अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिल्या तसेच जल व्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ हा केवळ १५ दिवस न राबविता वर्षभर राबविण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग सुरेंद्र पवार बीड यांनी तर सूत्रसंचालन संतोष बनकर यांनी केले.

## खरीप हंगाम २०२५ जिल्हास्तरीय कार्यशाळा प्रशिक्षण वर्ग बीड येथे संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

खरीप हंगाम २०२५ची पूर्वतयारी व नियोजनाकरिता जिल्हा अंतर्गत कृषी विभागातील सर्व अधिकार व कर्मचारी यांची एकदिवसीय कार्यशाळा बुधवार दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी बीड येथे संपन्न झाली.

या कार्यशाळेस विभागीय कृषी सहसंचालक पी.आर. देशमुख छत्रपती संभाजीनगर, अधीक्षक कृषी अधिकारी विभागीय कृषी सहसंचालक माधुरी सोनवणे छत्रपती संभाजी नगर, जिल्हाध्यक्ष कृषी अधिकारी बीड, एस. एम. साळवे, नोडल अधिकारी तथा अधिक्षक्ष अभियंताव प्रशासक पल्लवी जगताप, लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण बीड, डी.व्ही. जाधवर, कृषी उपसंचालक एस एस सय्यद, कृषी विकास अधिकारी बीड तसेच सर्व उपविभागीय अधिकारी उपस्थित होते. यावेळी येणाऱ्या आगामी खरीप हंगाम २०२५ ची पूर्वतयारी व नियोजना बाबत क्षेत्रीय स्तरावर करावयाच्या विविध मोहिमा यामध्ये माती परिक्षण मोमि, घरगुती बियाणे उगवण क्षमता चाचणी मोहीम, बीज प्रक्रिया मोहिम, हुमणी किड निमंत्रण मोहीम, खरीप पिकाच्या तंत्रज्ञान प्रसारासाठी गावनिहाय प्रशिक्षण मोहीम, कृषी निविष्ठांच्या वाजवी वापराबाबत जनजागृती मोहीम, आपत्कालीन पीक नियोजन कार्यशाळा प्रशिक्षण सत्रे इत्यादी करिता दिलेल्या वीत वेळ वेळापत्रकानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत पी.आर. देशमुख विभागीय कृषी सहसंचालक यांनी उत्कृष्ट सादरीकरणाद्वारे सविस्तर व सखोल मार्गदर्शन केले.

आगामी खरीप हंगामाकरिता खते, बियाणे व आवश्यक निविष्ठा यांचे मान्सून आगमनाच्या पूर्वीच तालुका न्याय पुरवठा नियोजन तसेच त्यांच्या गुणवत्ता नियंत्रणाच्या अनुषंगाने आवश्यक कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले. सदर कार्यशाळेत जिल्ह्यातील कृषी विभागाचे सर्व कृषी सहाय्यक, कृषी प्रर्यवेशक, मंडळ कृषी अधिकारी, कार्यालय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी, जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक, उपविभागीय कृषी अधिकारी तसेच सर्व तंत्र अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी जिल्ह्यातील कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या विविध शेतकरी गटाच्या तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मान्यवराच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी एस.एम. साळवे तर आभार प्रदर्शन कृषी उपसंचालक डी.व्ही. जाधवर यांनी केले.

## जिल्हास्तरीय लॅक्रोस टीमची पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**बीड । प्रतिनिधी**

नुकत्याच बीड जिल्हा लेक्रॉस असोसिएशनच्या वतीने जिल्हास्तरीय निवड चाचणी द.बा. घुमरे माध्यमिक विद्यालय बीड येथे घेण्यात आली. या चाचणीमध्ये निवड झालेल्या संघ पुणे येथे होणार्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. जिल्हा संघामध्ये निवड झालेल्या खेळाडू जुनिअर गट मुली तनुजा हाडुळे, सृष्टी जाधव, गौरी नागपुरे, श्रावणी मुळे, सुहानी शिंदे, अदिती शिंदे, सिद्धी जाधव, अक्षता बंड, ज्ञानेश्वरी नागरगोजे,जुनिअर गट मुलांमध्ये अमोल ढवळे, संकेत वायकर , आर्यन ढवळे, कृष्णा मेहेत्रे, ओम जाधव, युवराज वाघ, पृथ्वीराज गिरी सीनियर गट मुले रोहित ढवळे ,दिनेश ढाकणे, संदीप सानप ,संतोष सानप, आशिष कोठुळे, अमोल ढवळे, रवी जाधव, अतुल लोंढे, सुभाष भंडाने या खेळाडूंची लेकरूस बीड जिल्हा संघात निवड झाली आहे. वरील साडू पुणे येथे होणार्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, पदाधिकारी अनिकेत काळे, क्रीडा मार्गदर्शक राठोड सर, जितू आराक सर, बीड जिल्हा लेक्रॉस असोसिएशन अध्यक्ष रामदास गिरी, सचिव विशाल गिरी , माऊली डोळे, रोहित ढवळे, अन्य प्रशिक्षक व पालकनी निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन केले व राज्यस्तरीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## मेरा ई केवायसी ॲप वापरा आणि रेशन कार्डची घरच्या घरी केवायसी करून घ्या : तहसीलदार चंद्रकांत शेळके



**बीड । प्रतिनिधी**

केंद्र व राज्य शासनाने रेशन लाभार्थ्यांना ई–केवायसी बंधनकारक केली आहे . केवायसीला आता ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ मिळाली आहे . आता घरबसल्या लाभार्थी आपली ई–केवायसी मोबाइलद्वारे करू शकतील. सर्वोच्च न्यायालय , तसेच केंद्र सरकारने राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतील सर्व लाभार्थ्यांची ई–केवायसी पडताळणी करण्याच्या सूचना यापूर्वीच राज्य सरकारला केल्या आहेत . त्यानुसार राज्यातील सर्व रास्त भाव दुकानांवर ई – केवायसी मोहीम हाती घेऊन ही कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याची सूचना सर्व क्षेत्रीय कार्यालयांना दिल्या होत्या. राज्य शासनाने रेशन लाभार्थ्यांना केवायसी करण्यासाठी वेळोवेळी मुदतवाढ दिली आहे . यापूर्वी केवायसी करण्यासाठीची १५ मार्च ही मुदत होती, ती आता ३१ मार्च करण्यात आली होती. आता त्यास पून्हा ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यानुषंगाने बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक , जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख यांनी जिल्ह्यातील उर्वरित लाभार्थी यांचे केवायसी तातडीने पूर्ण करून घेण्याबाबत सूचना केल्या आहेत. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी मेरा ई केवायसी ॲप सोप्या पद्धतीने कसे वापरावे याबाबत सविस्तर माहिती दिली आहे. यानुसार लाभार्थ्यांना ई केवायसी करून घेणे सोपे होईल .

अशी करा ई केवायसी : १ ) तुमच्या मोबाईल मध्ये मेरा ई केवायसी प इंस्टॉल करा, २) ॲप ओपन करा ,ॲपला कॅमेरा आणि लोकेशन वापरण्याचे परमिशन द्या. ३ ) फेस आर डी ॲप इन्स्टॉल करा . ४ ) राज्य निवडा . व्हेरिफाय लोकेशन या बॅटणावर क्लीक करा. ५) आधार नंबर टाकून जनरेट ओटीपी या बटनावर क्लिक करा. ६ ) आधार नंबरला लिंक असलेल्या मोबाईलवर आलेला ओटीपी आणि कॅमच्या कोड टाकून सबमिट बटनावर क्लिक करा . ७ ) तुमच्या राशन कार्डवरचा सर्व तपशील दिसेल , त्याखाली फेस ई केवायसी हे बटन दिसेल , त्यावर टच करा. ८ ) कंसेन्ट अक्सेप्ट करा . फेस आर डी ला कॅमेरा वापरण्याची परमिशन द्या .कॅमेरा कसा वापरावा या संदर्भातील काही सूचना या ठिकाणी दिसतील त्या सविस्तर वाचून घ्या . ९ ) चौकटीत टीक करा , प्रोसीड या बटणावरती टच करा . १० ) फोटो कॅप्चर करा . झाली तुमची ई केवायसी

बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी वेळोवेळी उर्वरित लाभार्थ्यांची रेशन कार्ड केवायसी करून घेण्याबाबत स्वस्त धान्य दुकानदारांना सूचना केलेल्या आहेत . बीडचे पुरवठा निरीक्षण अधिकारी प्रशांत सुपेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार बीड तालुक्यात प्राधान्य कुटुंब योजनेचे ६३४८१ , अंत्योदय अन्न योजनेचे ७२९७ , ए पी एल शेतकरी संख्या १९७८३ , एन पी एच शिधापत्रिकाधारक संख्या ९५१५ तर शुभ्र शिधापत्रिका धारकांची संख्या १५६८ इतकी आहे . अशाप्रकारे तालुक्यात एकुण १ लाख १७२८ इतके शिधापत्रिका धारक आहेत. पुरवठा विभागाचे अव्वल कारकून संतोष मुळीक यांनी कळविल्यानुसार तालुक्यातील एकुण ३४८ स्वस्त धान्य दुकानातील ए पी एल शेतकरी १९७८३ पैकी ५८९८ शिधापत्रिकाधारक यांना डीबीटीची रोख रक्कम प्राप्त झाली असून प्रतिव्यक्ती १७० रुपयाप्रमाणे सुमारे पावणेचार कोटी रुपये महिला कुटुंब प्रमुख यांच्या खात्यात जमा झाले आहेत . काही शेतकरी लाभार्थी शिधापत्रिकाधारक यांचे बँक खाते केवायसी न केल्याने खात्यात रक्कम जमा झालेली नाही , तरी त्यांनी बँक खाते केवायसी करून घ्यावेत असे त्यांनी कळविले आहे .ज्या एपीएल शिधापत्रिकाधारक शेतकरी यांनी तहसील कार्यालयात फार्म भरुन दिलेला नाही , त्या शिधापत्रिकाधारक यांनी आपल्या कुटुंबातील कर्त्या महिलेचे बँक पासबुक , आधार कार्ड व कुटुंबातील कोणत्याही एका सदस्याचा सातबारा तहसील कार्यालयात जमा करावा , असे आवाहन अव्वल कारकून सुरेश वायभट यांनी यावेळी केले . पी एच एच व अंत्योदय अशा ७०७७८ कुटुंबातील ३ लक्ष २३३ लाभधारक ( सदस्य ) यांची ईकेवायसी स्वस्त धान्य दुकानदारांमार्फत करणे सुरू आहे . महत्वाचे म्हणजे कुटुंबातील सर्वच सदस्यांची ई केवायसी करून घेणे आवश्यक आहे. त्यापैकी ९० हजार लाभधारक यांची ई केवायसी अजूनही बाकी आहे. ही सुविधा दिनांक ३० एप्रिलपर्यंत स्वस्त धान्य दुकानदार यांच्याकडेही उपलब्ध आहे जी सुविधा निशुल्क आहे.

# बीड जिल्हा रुग्णालय आरोग्य सेवेला मिळाले उत्तम व कर्तव्यदक्ष प्रशासक

**डॉ. संजय राऊत, डॉ. संतोष शहाणे, डॉ.लक्ष्मीकांत तांदळे,डॉ. सुधीर राऊत, डॉ. सदाशिव राऊत, डॉ.हनुमंत पारखे याची शिस्तप्रिय प्रशासक म्हणून ओळख**







**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा रुग्णालयात गेल्या अनेक दिवसापासून अनेक घडामोडी घडताना आपण पाहत आहोत. २०२४–२५ या एका वर्षात चार जणांनी जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून जिल्हा रुग्णालयाचा व जिल्ह्याचा वरिष्ठ आरोग्य म्हणून काम पाहिले. प्रत्येकाची आपापली काम करण्याची पद्धत वेगळी होती. बीड जिल्हा भरातील आरोग्य अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडत असताना अनेक अनंत अडचणी येतात. कारण आरोग्य सेवा ही जन्म –मृत्यूच्या दारात उभा डॉक्टर आणि आरोग्य सेवक म्हणून पाहिला जात.

बीड जिल्हा हा अति संवेदनशील म्हणून राज्यभर नाही तर देशभर त्याची ओळख आहे. या जिल्ह्यात वरिष्ठ अधिकारी टिकत नाहीत किंवा चांगले अधिकारी टिकू दिले जात नाहीत. हे बीड जिल्ह्याचे दुर्दैवच म्हणावं लागेल. बीड जिल्ह्यातील खेडोपाडी –वाडी –वस्ती तांड्यावरील अनेक लोक गोरगरीब आहेत. त्यांच्याकडे आर्थिक सोर्स नाही. काम केल्याशिवाय पर्याय नाही सहा महिने ऊस तोडीसाठी बाहेर राज्यात आणि सहा महिने गावाकडे असताना हाताला काम नाही. त्यामुळे त्यांच्या शरीरावर आरोग्यावर नक्कीच परिणाम होतो. त्यांच्याकडे एकमेव सरकारी दवाखान्याचा पर्याय शिल्लक राहतो. अशावेळी खाजगी रुग्णालय परवडत नाहीत मग त्यांना आधार देण्यासाठी शासकीय रुग्णालय जिल्हाभरातील मोफत उपलब्ध आहेत. बीड जिल्हा रुग्णालयात दिवसाकाठी २००० +पेक्षा जास्त रुग्ण ओपीडी विभागात येतात. त्यातील अनेक रुग्ण हे ॲडमिट ही होतात. जिल्हा रुग्णलय दिवसभर रुग्णांनी गजबजल असत. रुग्णालयातील विविध विभाग ओपीडी,आयपीडी, ऑपरेशन थिएटर, सिजर वार्ड, लेबर रूम, अतिदक्षता विभाग,एक्सरे,सोनोग्राफी, सिटीस्कॅन, लेबररूम, एमटीबी वार्ड, यासह अपघात विभाग, नेत्र विभाग, जळीत वार्ड, यासह जिल्हा रुग्णालयामध्ये दिवसभर रुग्ण असतात. या सर्व विभागावर सुरक्षा गार्ड रात्रंदिवस लक्ष ठेवून असतो रुग्ण नातेवाकांची प्रचंड ये– जा दिवसभर सुरू असते. सुरक्षा रक्षक यांचीही तार्यावरची कसरत रोज पाहायला मिळते अनेक जण त्यांच्याशी वाद घालताना सुद्धा समोर येत आहे. रुग्ण नातेवाईक यांना कुठलाही कसलाही दम नाही त्यामुळे छोट्या मोठ्या रोज वादावादीच्या घटना घडताना पाहायला मिळतात. जिल्हा रुग्णालयाचा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पार्किंगचा तो आता शंभर टक्के मिटलेला आहे. स्वच्छता परिसरात नेहमीच ठेवले जाते. दिवसभर डॉक्टर सुधीर राऊत हे स्वच्छतेसह, पाणी जिल्हा रुग्णालयाला येणाऱ्या अडीअडचणी सोडण्यात व्यस्त असतात. स्वच्छ प्रतिमा आणि नम्रता हा त्यांचा स्वभाव नेहमीच जिल्हा रुग्णाण्यात पाहायला मिळतो. अतिरिक्त शल्य चिकित्सक डॉ.संतोष शहाणे यांच्याकडे कुठलीही तक्रार –अडचण घेऊन कोणताही– रुग्ण –नातेवाईक कर्मचार गेला तर ती लगेच त्याच क्षणी सोडण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न ही असतो. बाह्य रुग्णालयाचे विभागाचे प्रमुख डॉ. लक्ष्मीकांत तांदळे. यांची सुद्धा एक चांगली डॉक्टर म्हणून ओळख आहे. ते जिल्हाभरातील विविध संस्थेतील अडीअडचणी सोडवण्यासाठी आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ रुग्णांना देण्यासाठी रात्रंदिवस तत्पर असतात. त्यांच्या सोबतीला डॉ. हनुमंत पारखे नेहमीच साथ देतात. नव्यानेच रुजू झालेले जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून डॉक्टर संजय राऊत, यांनी या अगोदर केज येथील उपजिल्हा रुग्णालयात अधीक्षक व रुग्णालयाचे प्रमुख म्हणून त्यांनी आरोग्य सेवा सेवा उत्तमरीत्या पार पाडलेले आहे. आता ते जिल्ह्याचे आरोग्य सेवेचे सेवेकरी आहेत. ते एक उत्तम प्रशासक व शिस्तप्रिय अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे.


### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एस.पी. वानखडे यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९२/२०२३**

**आसाराम कादे व ईतर विरूध्द निरंक**

ज्याअर्थी मयत नामे सत्यभामा भ्र. रामराव कादे हे / हया दिनांक १४/०८/२०२२ रोजी मौजे खेर्डावाडी, ता. गेवराई, जि.बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क.१ आसाराम पि. रामराव कादे, वय ४७, धंदा शेती, रा. खेर्डावाडी, ता. गेवराई, जि.बीड, २. रामराव पि. बाबुराव कादे, वय ७० वर्षे, धंदा शेती, रा. सदर, यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की.. जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत सत्यभामा भ्र. रामराव कादे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २३/०९/२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारीख २३/०६/२०२५

(मार्फत – ॲड. एस. एल. मेघारे, गेवराई)

आदेशावरून. (स्वाक्षरीत) सहाय्यक अधीक्षक, दिवाणी न्यायालय,क.स्तर, गेवराई

(स्वाक्षरीत) क.लिपीक — शिक्का

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एन. ए. रणदिवे यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३७६ / २०२५**

**राधाबाई लक्ष्मण भुसे व ईतर वि निरंक**

ज्याअर्थी मयत नामे लक्ष्मण पि. साहेबा भुसे रा. कोल्हेर, ता. गेवराई जि. बीड हे / ह्या दिनांक २०/०३/२०२३ रोजी मौजे कोल्हेर ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/ झाल्या आहेत. अर्जदार क. १ राधाबाई भ्र. लक्ष्मण भुसे वय – ६२ वर्षे, धंदा– घरकाम रा. कोल्हेर, ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. २ अशोक पि. लक्ष्मण भुसे वय वर्षे, धंदा – शेती रा. कोल्हेर, ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. ३ योगेश पि. लक्ष्मण भुसे वय – ३१ वर्षे, धंदा – शेती रा. कोल्हेर, ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. ४ कैलास पि. लक्ष्मण भुसे वय २९ वर्षे, धंदा शेती रा. कोल्हेर, ता. गेवराई जि. बीड, यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या व गैरअर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे लक्ष्मण पि. साहेबा भुसे रा. कोल्हेर, ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १७/०४/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारीख १३/०६/२०२५

(मार्फत– ॲड. व्ही. एन. पवार गेवराई)

आदेशावरून. (स्वाक्षरीत) सहाय्यक अधीक्षक, दिवाणी न्यायालय,क.स्तर, गेवराई

(स्वाक्षरीत) क.लिपीक — शिक्का

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि.बीड येथीलसह दिवाणी न्यायाधीश क. स्तर श्री. कौस्तुभ नागेश मराठे यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३६५/२०२५**

**गंगुबाई व इतर विरुद– निरंक**

ज्याअर्थी मयत नामे रंगनाथ मारोती धांडे हे दिनांक ०४.०३.२०२५ रोजी सुर्डी बु. ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले आहेत.

१. गंगुबाई भ्र. रंगनाथ धांडे, वय. ६८ वर्षे धंदा– घरकाम, २.सावता पि. रंगनाथ धांडे, वय ४० वर्षे धंदा– शेती, दोघे रा. सुर्डी बु. ता. गेवराई जि. बीड, ह.मु.१४ एनओ, रेणुका नगर, रेणुका मंगल कार्यालया जवळ परभणी ता. जि. परभणी. ३. आशा भ्र. बाबासाहेब आनारसे, वय ४५ वर्षे धंदा–घरकाम,रा. केरुळ ता. आष्टी, जि. बीड, ४.कविता भ्र. कचरू माळवदे, वय. ३६ वर्षे धंदा–घरकाम, रा. गोंदी ता. अंबड जि. जालना, ५.कान्होपात्रा भ्र. विक्रम गोरे, वय. ३४ वर्षे धंदा–घरकाम, रा. वाघोरा ता. माजलगाव जि. बीड, ६. उशा भ्र. बाळु आनारसे,वय. ३३ वर्षे धंदा– घरकाम, रा. केरूळ ता. आष्टी जि. बीड

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे रंगनाथ मारोती धांडे रा. सुर्डी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १६.०४.२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले पुढील तारीख ०९.०५.२०२५

(मार्फत ॲड. एम. डी. धांडे गेवराई)

आदेशावरून. (स्वाक्षरीत) सहाय्यक अधीक्षक, दिवाणी न्यायालय,क.स्तर, गेवराई

(स्वाक्षरीत) क.लिपीक — शिक्का

## पुरूषोत्तमपुरी सज्जाचे तलाठी हजारे यांची बदली करा - उपविभागीय अधिकाऱ्यांकडे मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील पुरूषोत्तमपुरी सज्जाचे तलाठी एस. जी. हजारे हे सज्जावर सतत गैरहजर राहत असल्याने शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे. त्यामुळे तलाठी हजारे यांची बदली करा अशी मागणी बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे यांनी उपविभागीय अधिकारी यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यातील पुरूषोत्तमपुरी सज्जाचे तलाठी एस. जी. हजारे सतत गैरहजर असतात. कार्यालयात येत नाहीत परिणामी शेतकरी वर्ग, शेतमजुर, विद्यार्थी यांची हेळसांड होत आहे. याचा विचार करून सदरील तलाठ्याची बदली करावी. येत्या सात दिवसात बदली न झाल्यास पुरूषोत्तमपुरी येथील शेतकऱ्यांच्या वतीने आंदोलनाचा ईशाराही देण्यात आला आहे. निवेदनावर बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची शनिवारी परळीत महत्त्वपूर्ण बैठक

## खा.बजरंग बाप्पा सोनवणे व राजेंद्र मस्के यांची उपस्थिती; पदाधिकारी कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने परळी विधानसभा मतदारसंघाचा आढावा, पक्षाच्या विविध आघाडीवरील पदाधिकाऱ्यांच्या निवडी तथा कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याच्या अनुषंगाने शनिवार दिनांक १९ एप्रिल २०२४ रोजी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील राजेभाऊ फड यांच्या जनसंपर्क कार्यालयात ही बैठक सकाळी ११ वाजता संपन्न होणार आहे. या बैठकीस बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे तसेच पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह मान्यवर नेतेमंडळींची उपस्थिती असणार आहे.





राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या परळी विधानसभा मतदारसंघातील सर्व सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच पक्षावर निष्ठा ठेवणाऱ्या सर्वांची महत्त्वपूर्ण बैठक शनिवार दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे तसेच पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या उपस्थितीत सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील राजेभाऊ फड यांच्या जनसंपर्क कार्यालयात ही बैठक संपन्न होणार आहे. या बैठकीत मतदारसंघातील विविध महत्त्वपूर्ण मुद्यांवर चर्चा केली जाणार असून, पक्षाच्या नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यासाठी पक्षाचे सर्व मार्गदर्शक नेतेमंडळी आढावा घेणार आहेत. या बैठकीस परळी विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी उपस्थित रहावे असे आवाहन पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्यासह उत्तम दादा माने, मिनिनाथ दादा फड, देवराव महाराज लुगडे, बाबासाहेब शिंदे, जीवनराव देशमुख, एच.यू.फड, शंकर शेजुळ, वर्षाताई रायभोळे, कल्पनाताई देशमुख, रमेश ढाकणे, सोमनाथ भोसले, फिरोज सय्यद, कल्पनाताई देशमुख, मंगलताई सोळंके, अश्विनीताई सोळंके, दीपाली सावंत, अश्विनी सरवदे, हनुमंत फड, डॉ.जे.एन. शेख, गणेश देवकते, भीमराव हाके, प्रकाश राठोड, राजेश फड, शिवाजीराव नागरगोजे, शिवाजीराव लोमटे, भगवानराजे कदम, एकनाथ मुंडे, गोपाळराव सलगर, प्रकाश मुंडे, पप्पू गित्ते, समाधान मुंडे, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले आहे.

## थोडक्यात

### पठाण साहेब हसन साहेब यात्रेला पाटोद्यात उत्साहात सुरुवात

**संदल बैलगाडीतून मिरवणूकीतील; विविध देखाव्यातून, हिंदू-मुस्लिम एकतेचा संदेश**



**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहरात पठाण साहेब आणि हसन साहेब यांच्या पारंपरिक यात्रेला बुधवारी उत्साही सुरुवात झाली. या यात्रेची मिरवणूक बैलगाडीतून काढण्यात आली असून, विविध देखावे, सजावटी व पारंपरिक वेशभूषेने सजलेल्या मिरवणुकीने पाटोदेकरांचे लक्ष वेधून घेतले.या संदल मिरवणुकीची खासियत म्हणजे हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्र येत ही यात्रा पार पाडली. यामधून सामंजस्य,ऐक्य आणि धार्मिक सौहार्दाचा एक सकारात्मक संदेश संपूर्ण तालुकाभर पोहोचला आहे.यात्रेच्या संदल मिरवणुकीत नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव, सभापती रामेश्वर गोरे,तसेच नगरसेवक न्युयमभाई पठाण यांनीही सहभाग घेत.ढोल-ताशांच्या गजरात लेझीम नृत्य केले या यात्रेमुळे पाटोदा शहरात धार्मिकतेसोबतच सामाजिक ऐक्याचे दर्शन घडले. यात्रेचे आयोजन पाटोदा नगरपंचायतने एकदम शिस्तबद्ध व प्रभावी केल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

### जीवनात आहार विहार व विचार या त्रिसुत्रीचा योग्य वापर करावा: प्रा.सुधाकर वणवे



**चौसाळा । प्रतिनिधी**

मानवी जीवनात आहाराला खूप महत्व आहे पोषणयुक्त आहाराने मानवी वर्तनात खूप बदल होतो. त्यामुळे आपण आहार विहार व विचार या त्रिसूत्रीचा आपल्या जीवनात योग्य पद्धतीने वापर करावा असे आवाहन प्रा.डॉ. सुधाकर वनवे यांनी केले. कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे गृहशास्त्र विभाग व महिला कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पोषण पखवाडा कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते पुढे बोलताना डॉ. वनवे म्हणाले की, सध्याच्या काळात आपण अन्न जर औषधासारखे सेवन केले नाही तर पुढील काळात आपणाला औषधे अन्नासारखी खावी लागतील. अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य डॉ. विलास भिल्लारे म्हणाले आपण अन्नाचे सेवन केले तर आपले शरीर चांगले राहिल प्रास्ताविक व सूत्रसंचालन करताना प्रा.डॉ. सय्यद शाहीन यांनी पोषण पखवाडा ची रूपरेषा सांगितली फळांची धान्याची रांगोळी स्पर्धा पोषण पाककृती महिलांना आहाराचे महत्व तसेच गर्भवती महिलांना आहार व लसीकरण याचे महत्व असे विविध कार्यक्रम घेतले जाणार आहेत या वेळी व्यासपीठावर उपप्राचार्य चांगदेव शेळके प्रा. अरुणा नावेकर यांची उपस्थिती होती. आभार प्रा. सीमा पवार यांनी व्यक्त केले.

### मुख्याध्यापक शेरखान सर यांच्या वाढदिवसानिमित्ताने मिल्लिया शाळेत वृक्षारोपण



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील सुप्रसिद्ध मिल्लिया प्राथमिक (मुलांची) शाळेचे मुख्याध्यापक शेरखान सर यांचा वाढदिवस शाळेत वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला. शेरखान सर हे पेशाने जरी मुख्याध्यापक असले तरी त्यांचा सामाजिक कार्यात नेहमी हिरीरीने सहभाग असतो. समाजात वावरताना आपल्याकडून समाजातील दीनदलित, गोरगरीब, गरजू लोकांसाठी विद्यार्थ्यांसाठी शक्य होईल ते कार्य करण्यास ते नेहमी पुढाकार घेतात. नुकताच त्यांचा वाढदिवस होता. या निमित्ताने त्यांचे सहशिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी झाडांची रोपे आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिष्टचिंतन करून शुभेच्छा दिल्या. त्यांनी सहकाऱ्यांकडून देण्यात आलेल्या झाडांची रोपे ही शाळेच्या आवारातच रोपित केली. यावेळी पठाण अमजद, शेख वसीम, वरिष्ठ लिपिक इम्रान सर, मोमीन अज़हरोद्दीन सर, इक्बाल सर, मिल्लिया शाळेचे शिक्षक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# लऊळ गावातील घनकचरा व्यवस्थापन कामाची चौकशी करा

## - गटविकास अधिका-यांकडे अशोक डोणे यांची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील लऊळ गावातील मारोती मंदिर परिसरातील सुरू असलेले नाली बांधकाम बंद करावे, कारण सदर बांधकाम हे ईस्टीमेट प्रमाणे होत नसुन त्यातील गज, सिमेंट व इतर साहित्य नियमानुसार वापरात येत नसल्याने या कामाची चौकशी करावी अशी मागणी अशोक डोणे यांनी पंचायत समिती गटविकास अधिकारी यांचेकडे निवेदनाव्दारे करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मुख्य नाल्याच्या वरील बाजुस चार उपनाले असुन ते तीन नाले दोन फुट रूंदी व तीन फुट उंच तर चौथी नाली तीन फुट रूंद व तीन फुट उंच आहे. वरील नाल्या पाहता नाल्यांचे पाणी पावसाळ्यात बसणार नाही. हा नाला गावातील मुख्यनाला आहे. यामध्ये गावातील फक्त सांडपाणी नसुन गावाच्या बाहेरील व पात्रुड शिवारातील पाणी, पावसाळी पाणी येते. नालीचे होत असलेले काम पाहता सदरील पाणी या नाल्यात बसणार नाही व लोकांच्या घरामध्ये व मारोती मंदिर, महादेव मंदिर व विठ्ठल रूक्मीणी मंदिराच्या परिसरात त्यामुळे रोगराई होउन त्यामुळे या घनकचरा व्यवस्थापन कामाची चौकशी करावी व तात्काळ काम बंद करावे अन्यथा आंदोलन करण्याचा ईशारा अशोक मसुराम डोणे यांनी पंचायत समिती गटविकास अधिकारी यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे.

## पत्रकार महेश सदरे यांना मातृशोक

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेचे सचिव पत्रकार महेश धोंडीराम सदरे यांच्या आई श्रीमती निलावती धोंडीराम सदरे यांचं (दि. १६ एप्रिल) सकाळी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्या ८३ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेचे सचिव पत्रकार महेश सदरे यांच्या मातोश्री श्रीमती निलावती धोंडीराम सदरे वय वर्षे ८५ यांचे बुधवारी सकाळी ७ वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले . त्यांच्या पाशच्यात तीन मुले,पत्रकार महेश सदरे,हनुमंत सदरे व सुनील सदरे, सुना, दोन मुली, जावई, नातु,पनतु असा मोठा परिवार आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

## आनंदऋषिजी हॉस्पिटल बीड येथे महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत डायलेसिस सेवा उपलब्ध

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित, बीड येथील जालना रोड, शाहु बँकेजवळ असलेले आनंदऋषीजी हॉस्पिटल बीड येथे महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत उपलब्ध .

वैद्यकीय सेवा दिवसेंदिवस महाग होत असल्याने बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना डायलेसिस सेवा मोफत उपलब्ध. डायलेसिस असणार्या रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज बीडच्यावतीने करण्यात आले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल आणि मेडिकल रिसर्च सेंटरमध्ये, आम्ही किडनीशी संबंधित आव्हानांना तोंड देत असलेल्या व्यक्तींना उच्च दर्जाची, वैयक्तिकृत डायलिसिस काळजी प्रदान करण्यासाठी समर्पित आहोत. आमची अत्याधुनिक सुविधा, अनुभवी वैद्यकीय संघ आणि रुग्ण-केंद्रित दृष्टीकोन हे सुनिश्चित करतात की प्रत्येक रुग्णाला त्यांच्या डायलिसिस प्रवासादरम्यान शक्य तितकी सर्वोत्तम काळजी मिळते.

वैशिष्ट्ये:- सुसज्ज फ्रेसेनियस कंपनीचे डायलिसिस युनिट उपचारांसाठी आरामदायक आणि स्वच्छ वातावरण प्रदान करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत. नेफ्रोलॉजिस्ट, परिचारिका आणि तंत्रज्ञांची आमची टीम डायलिसिस काळजीमध्ये अत्यंत कुशल आणि अनुभवी आहे, जे चोवीस तास सुरक्षित आणि प्रभावी उपचारांची खात्री देते.

आम्ही प्रत्येक रुग्णाच्या विशिष्ट गरजा आणि प्राधान्ये पूर्ण करण्यासाठी वैयक्तिकृत काळजी, टेलरिंग उपचार योजनांना प्राधान्य देतो. आम्ही विविध जीवनशैली

▶▶ उर्वरित पान २ वर






# विमा योजनेचा ग्राहकांनी लाभ घ्यावा

## एसबीआय बँकेचे वरिष्ठ अधिकारी राज ईबिंजर, अमित धुळे, अंकुश जाधव यांचे आवाहन

**वडवणी । प्रतिनिधी**

शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या सर्व विमा योजना भारतीय स्टेट बँकेच्या वतीने ग्राहकांसाठी उपलब्ध आहेत. या योजना अल्प दरात आहे. आपण थोडेसे पैसे भरून प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना, प्रधान मंत्री जीवन ज्योती विमा योजना यासारख्या विविध योजनांचा लाभ घेतला तर कुटुंबाला आधार मिळू शकतो त्याचबरोबर आरोग्य आणि अपघात विमा योजना यासारख्या योजनांचा बराच फायदा मिळू शकतो त्यामुळे भारतीय स्टेट बँकेच्या सर्व ग्राहकांनी बँकेशी संपर्क साधून आपापले विमे काढून घ्यावेत व कुटुंबाला विमा कवच निर्माण करून घ्यावे असे आवाहन भारतीय स्टेट बँकेचे वरिष्ठ अधिकारी अमित धुळे व चीफ मॅनेजर राज ईबिंजर तसेच वडवणीचे शाखाधिकारी अंकुश जाधव यांनी केले आहे.



वडवणी तालुक्यातील पुसरा येथील आर्थिक परिस्थितीने गरीब असलेले मिठू विठ्ठल चिंचकर यांचा काही दिवसांपूर्वी मृत्यू झाला होता त्यांनी मृत्यूपूर्वी भारतीय स्टेट बँक वडवणी येथे वीस रुपये भरून प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत विमा भरला होता त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबाला दोन लाख रुपये विमा मंजूर करण्यात आला सदर विम्याचा धनादेश शुक्रवारी त्यांच्या कुटुंबांच्या स्वाधीन करण्यात आला. बँकेचे चीफ

▶▶ उर्वरित पान २ वर

### वेळ आल्यावर विमा योजनाच धावून येते

**कोणाचा अपघात झाला अथवा अपघातात अपंग झाल्यानंतर घराची खूप मोठी आर्थिक हानी होते आरोग्याच्या अनेक सुविधा विमा योजने माध्यमातून मिळू शकतात अपघातात होणारा दवाखान्याचा खर्च देखील विमा योजनेच्या माध्यमातून मिळू शकतो एवढेच नाही तर एखाद्या व्यक्तीचा काही कारणाने मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबाला देखील विमा योजनेमुळे आधार मिळू शकतो त्यामुळे या योजनेचा फायदा मिळून घेण्यासाठी कोणीही ग्राहकांनी वेळ न वाया घालवता योजनेचा फायदा घ्यावा असे आवाहन शाखाधिकारी अंकुश जाधव यांनी केले**